**<u>ठळक बातम्या</u>**

- पाण्याच्या प्रत्येक थेंबाचं संरक्षण, आणि जबाबदारीनं वापर करण्यासाठी आपण सर्व वचनबद्ध असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

- आगामी काळात 'ग्लोबल साऊथ'मधल्या उदयोन्मुख अर्थव्यवस्थांच्या तंत्रज्ञानविषयक गरजा भारत पूर्ण करेल, असा केंद्रीय शिक्षण मंत्र्यांचा विश्वास

- होर्मुझची सामुद्रधुनी केवळ इराणच्या शत्रूंसाठीच बंद असल्याचं इराणचं स्पष्टीकरण

- महाराष्ट्रात हॉटेलं, उपाहारगृहांसाठी उद्यापासून आणखी २० टक्के गॅस पुरवठा होणार

**आणि**

- इंडियन ओपन २०२६ स्क्वॉश स्पर्धेत भारताच्या अनाहत सिंगनं पटकावलं महिला एकेरीचं विजेतेपद

**<><><><><>**

पाण्याच्या प्रत्येक थेंबाचं रक्षण आणि त्याचा जबाबदारीनं वापर करण्यासाठी आपण सर्वजण वचनबद्ध असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. पाणी जीवनाचा आधार असून पृथ्वीच्या भविष्याचा आकार असल्याचं प्रधानमंत्र्यांनी आंतरराष्ट्रीय जल दिनाच्या निमित्तानं दिलेल्या संदेशात म्हटलं आहे. संयुक्त राष्ट्र संघानं देखील या निमित्तानं पाणी आणि लिंग समानता या अनुषंगानं ‘जिथे पाणी वाहतं तिथं समानता वाढते’ ही संकल्पना मांडली असून जल व्यवस्थापनातली महिलांची महत्वपूर्ण भूमिका आणि पाण्याच्या दुर्भिक्ष्यामुळे त्यांच्यावर होणारा परिणाम तसंच त्याबाबतच्या निर्णय प्रक्रियेत महिलांचा सहभाग अधोरेखित केला आहे.

**<><><><><>**

आगामी काळात भारत 'ग्लोबल साऊथ' मधल्या सर्व उदयोन्मुख अर्थव्यवस्थांच्या तंत्रज्ञानविषयक गरजा पूर्ण करेल, असं केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी म्हटलं आहे. ते आज आयआयटी मुंबई मध्ये आयोजित 'भारत इनोव्हेट्स डीप-टेक प्री-समिट २०२६' च्या समारोप समारंभात बोलत होते. येत्या दशकात भारत 'डीप-टेक' क्षेत्रात जगाचं नेतृत्व

करेल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. २०४७ पर्यंत 'विकसित भारताचं' उद्दिष्ट साध्य करण्याची जबाबदारी शिक्षण, उद्योग, अर्थ क्षेत्र आणि देशातल्या तरुणांची आहे, असं ते म्हणाले.

‘भारत इनोव्हेट्स २०२६’, हा भारताच्या तंत्रज्ञानविषयक भविष्याचा निर्णायक टप्पा ठरेल, असा विश्वास इस्रोचे माजी अध्यक्ष आणि आयआयटी मुंबईच्या नियामक मंडळाचे अध्यक्ष डॉ. के. राधाकृष्णन यांनी यावेळी व्यक्त केला.

या दोन दिवसीय कार्यक्रमात १३७ स्टार्ट-अप्सनी भाग घेतला असून, त्यांनी सुमारे २०० गुंतवणूकदार आणि ८० कॉर्पोरेट्सशी संवाद साधल्याची माहिती आयआयटी मुंबईचे संचालक शिरीष केदारे यांनी दिली.

**<><><><><>**

भारतीय शेतकरी, ऊर्जा आणि इंधन निर्मितीसाठी सक्षम असल्याचं केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी म्हटलं आहे. ते आज नवी दिल्लीत एका कार्यक्रमात बोलत होते. इंडियन ऑईल आणि भारत सरकार एकत्रितपणे एक लाख लिटर इथेनॉल, दीडशे टन बाय बिटुमन आणि ७८ हजार टन विमानाचं इंधन तयार करत असल्याचं त्यांनी सांगितलं. बायटेक्नॉलॉजीचा वापर केल्यामुळे डिझेलच्या आयातीवरचं अवलंबित्व कमी होईल, आणि आपला शेतकरी केवळ अन्नदाताच नाही तर उर्जादाताही होईल, अस ते म्हणाले….

**- -होल्ड - बाईट - -**

**<><><><><>**

निसर्गोपचार ही शाखा निसर्गाशी सुसंवाद राखायला प्रोत्साहन देते, असं उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन यांनी म्हटलं आहे. पुण्यात उरळी कांचन इथल्या निसर्गोपचार केंद्राच्या ८१व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते आज प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. पारंपरिक भारतीय उपचार पद्धती सध्याच्या काळाशी अधिक समर्पक असल्याचं ते म्हणाले.

या कार्यक्रमाला राज्यसभेचे उपाध्यक्ष हरिवंश सिंग, राज्यपाल जिष्णु देव वर्मा, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

**<><><><><>**

आसाम, केरळ आणि पुद्दुचेरी विधानसभा निवडणुकांसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठीची मुदत उद्या संध्याकाळी संपेल. परवा उमेदवारी अर्जांची छाननी होईल तर २६

मार्चपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेता येतील. या तीन विधानसभा निवडणुकांसाठी येत्या ९ एप्रिल रोजी एकाच टप्प्यात मतदान होणार आहे. तामिळनाडूमध्ये २३ एप्रिलला एकाच टप्प्यात मतदान होईल, तर पश्चिम बंगालमध्ये २३ आणि २९ एप्रिल अशा दोन टप्प्यात मतदान होईल. तामिळनाडू आणि पश्चिम बंगालमधल्या पहिल्या टप्प्याच्या मतदानासाठीची अधिसूचना येत्या ३० मार्चला जारी केली जाईल. तर बंगालमधल्या दुसऱ्या टप्प्यातल्या मतदानाची अधिसूचना २ एप्रिल रोजी जाहीर होईल. ही चारही राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशाची मतमोजणी ४ मे रोजी होईल.

<><><><>

लैंगिक शोषण केल्याप्रकरणी अटकेत असलेला नाशिकमधला भोंदूबाबा अशोक खरात याच्यावर आणखी एक गुन्हा दाखल झाला आहे. अशोक खरातने आपलं लैंगिक शोषण केल्याची तसंच ईशान्येश्वर मंदिर संस्थानासाठी पैसे घेतल्याची तक्रार एका महिलेनं केली आहे. याप्रकरणी नाशिकमधल्या सरकारवाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

<><><><>

होर्मुझची सामुद्रधुनी केवळ इराणच्या शत्रूंसाठीच बंद असल्याचं आंतरराष्ट्रीय सागरी संघटनेतले इराणचे प्रतिनिधी अली मौसवी यांनी म्हटलं आहे. ते इराणचे युनायटेड किंगडममधले राजदूतही आहेत. सध्याच्या सागरी संघर्षाचं मुख्य कारण प्रादेशिक तणाव असून, आखाती प्रदेश आणि होर्मुझच्या सामुद्रधुनीतल्या सध्याच्या परिस्थितीला अमेरिका आणि इस्रायल यांच्यातला संघर्षच कारणीभूत असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं. इराणची प्रादेशिक अखंडता आणि हक्क अबाधित राखून अंतरराष्ट्रीय दायित्वाचा समतोल साधायला हवा, असं ते म्हणाले.

सागरी सुरक्षेतले आंतरराष्ट्रीय निकष जपण्यासाठी आणि या प्रदेशात कार्यरत खलाशांच्या संरक्षणाची खात्री देण्यासाठी, आंतरराष्ट्रीय सागरी संस्था आणि विविध देशांबरोबर संवाद साधण्याची इराणची तयारी असल्याचं त्यांनी सूचित केलं.

<><><><>

रशियाहून कच्चं तेल घेऊन येणारं ॲक्वा टायटन हे जहाज आज कर्नाटकात मंगळुरु इथल्या बंदरात पोहोचलं. पश्चिम आशियातल्या संघर्षामुळे जगभरात वाढलेल्या इंधनाच्या किमती स्थिर करण्याच्या उद्देशानं अमेरिकेनं समुद्रात उभ्या असलेल्या रशियाच्या तेलवाहू

जहाजांना पुढे जाण्याची परवानगी दिल्यानंतर हे जहाज भारतात आलं आहे. याशिवाय अमेरिकेहून एलपीजी घेऊन येणारं एक मालवाहू जहाज देखील मंगळुरु इथं पोहोचलं आहे.

<><><><>

महाराष्ट्रात हॉटेल्स, उपाहारगृहांसाठी उद्यापासून २० टक्के अतिरिक्त गॅस पुरवठा होणार असल्याची माहिती अन्न, नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी दिली आहे. राज्यातली हॉटेल्स, ढाबे, उपहारगृहं, औद्योगिक कॅन्टीन, अन्न प्रक्रिया-दुग्धव्यवसाय, राज्य शासन किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांद्वारे चालवण्यात येणाऱ्या अनुदानित कॅन्टीन, कम्युनिटी किचन्स यांचा यात समावेश आहे. पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाने या संदर्भातली सूचना काल जाहीर केली होती. यापूर्वी राज्याला ३० टक्के वाटप मंजूर करण्यात आलं होतं. उद्यापासून पुढचा आदेश येईपर्यंत पुरवठ्यात आणखी २० टक्के वाढ केली जाणार आहे.

तसंच, राज्यातल्या केरोसिन वितरणाबाबतही महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत. प्रलंबित परवान्यांचं नूतनीकरण झाल्याचं मानलं जाईल आणि त्यासाठी कोणतंही शुल्क आकारलं जाणार नाही, असंही भुजबळ यांनी स्पष्ट केलं.

<><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सरकारचे प्रमुख म्हणून ८ हजार ९३१ दिवस पूर्ण केले असून भारतीय राजकारणात ते सर्वाधिक काळ सत्तेत असलेले नेते ठरले आहेत. त्यांनी सिक्कीमचे मुख्यमंत्री पवन चामलिंग यांना मागं टाकलं आहे. गुजरातचे मुख्यमंत्री आणि देशाचे प्रधानमंत्री म्हणून मोदी यानी सत्तेत २५ वर्षं पूर्ण केली आहेत.

संरक्षण मंत्री राजनाथ सिंग आणि केंद्रीय मंत्री जे पी नड्डा यांनी याबद्दल प्रधानमंत्र्यांचं अभिनंदन केलं आहे. प्रधानमंत्र्यांचं जीवन ही एक सेवा यात्रा असून अतूट बांधिलकी आणि समर्पित नेतृत्त्वाचं मूर्तिमंत उदाहरण आहे, असं राजनाथ सिंग यांनी म्हटलं आहे. तर प्रधानमंत्र्यांचा हा प्रवास अत्यंत प्रेरणादायी आहे आणि देशासाठी देखील हा एक अभिमानाचा क्षण आहे, असं नड्डा यांनी म्हटलं आहे. भाजपा अध्यक्ष नितीन नबीन यांनीही मोदी यांचं अभिनंदन केलं आहे.

<><><><>

इंडियन ओपन २०२६ स्क्वॉश स्पर्धेत भारताची अनाहत सिंगनं महिला एकेरीचं विजेतेपद पटकावलं आहे. आज मुंबईत ब्रेबॉर्न स्टेडिअम इथं झालेल्या अंतिम सामन्या तिनं इजिप्तच्या हाना मोताझवर ३-१नं मात केली.

पुरुष एकेरीच्या अंतिम सामना आज मुंबईतच होत असून अभय सिंग आणि वीर चोत्रानी या दोन्ही भारतीय खेळाडूंमध्येच लढत होत आहे. त्यामुळे भारताचं विजेतेपद निश्चित झालं आहे.

<><><><><>

आर्थिक घोटाळा प्रकरणी सहभाग असल्याच्या आरोपावरून सीबीआयनं उद्योगपती अनिल अंबानी यांच्या रिलायन्स कमर्शियल फायनान्स या कंपनीची चौकशी सुरु केली आहे. त्याअंतर्गत आज सीबीआयनं ऑथम इन्व्हेस्टमेंट अँड इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीच्या सल्लागाराची चौकशी केली. या कंपनीनं रिलायन्स कमर्शियल फायनान्स आणि रिलायन्स होम फायनान्स या सध्या चौकशी सुरु असलेल्या दोन कंपन्यांची मालमत्ता खरेदी केल्याचा सीबीआयचा आरोप आहे. बँक ऑफ महाराष्ट्रनं गेल्या वर्षी यासंदर्भात तक्रार दाखल केली होती.

//<><><><><>//